महानिर्मिती
महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित
प्रकाशगड, २ रा मजला, प्रो.अनंत काणेकर मार्ग, वांद्रे (पूर्व), मुंबई-४०० ०५१,

क्र.महानिर्मिती/मासं-सेप्र/ ०-६११९ दिनांक: २६ JUL 2022

## सूचना

**विषय:-** महाराष्ट्र राज्य वीज निर्मिती कंपनी मर्यादित जाहिरात क्र.०३/२०२० अंतर्गत "उप विधी अधिकारी " या रिक्त पदाच्या अनुषंगाने कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेअंती पात्र / अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी व ऑनलाईन वैयक्तिक मुलाखत परीक्षा प्रक्रियेकरीता १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी.

**संदर्भ:-** १) महानिर्मिती जाहिरात क्र.०३/२०२०
२) महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/समव्य (सेप्र-मासं)/१२४१९ दि.१७.१२.२०२१
३) महानिर्मिती सूचना क्र.महानिर्मिती/समव्य (सेप्र-मासं)/१२७९९ दि.२८.१२.२०२१

महानिर्मिती सरळसेवा जाहिरात क्र.०३/२०२० अंतर्गत "उप विधी अधिकारी" या पदाच्या ऑनलाईन परीक्षेत उमेदवारांना १०० गुणांपैकी प्राप्त झालेल्या गुणांच्या गुणानुक्रमे तसेच जाहिरातीत व तदनंतरच्या अधिसूचनेत देण्यात आलेल्या रिक्त पदांच्या अनुषंगाने तसेच सामाजिक आरक्षण विचारात घेऊन "उप विधी अधिकारी" या पदाच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेअंती पात्र / अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच ऑनलाईन वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्रसिध्द करण्यात येत आहे. सदरील पात्रता यादी खालील अटी व शर्तींच्या अधीन राहून तयार करण्यात आलेली आहे.

१) उमेदवारांची ऑनलाईन वैयक्तिक मुलाखत परीक्षेकरीता पात्रता ही जाहिरातीत नमूद रिक्त पदे, उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त झालेले गुण तसेच उमेदवारांनी कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेवेळी अर्जामध्ये दर्शविलेली त्यांची शैक्षणिक अर्हता, अनुभव, वय, जात, उन्नत-प्रगत गटात मोडत नसणे इत्यादी बाबत सादर केलेल्या मूळ प्रमाणपत्रांच्या अधीन राहून ठरविण्यात आली आहे.

२) उमेदवारांना ऑनलाईन परीक्षेत प्राप्त गुण व उमेदवारांनी अर्जामध्ये दर्शविलेली माहिती या आधारे ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीची पात्रता यादी तयार करण्यात आली आहे. केवळ ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीच्या पात्रता यादीत नाव आहे, म्हणून अंतिम निवड यादीत निवड करावी असा दावा उमेदवार करु शकणार नाही. उमेदवारांनी सादर केलेली कागदपत्रे पडताळणीअंती, कागदपत्रे जाहिरातीत नमूद अटीनुसार वैध असल्यास गुणानुक्रमे अंतिम निवडीसाठी विचार करण्यात येईल.

३) "उप विधी अधिकारी" या पदासाठी आवश्यक असलेली पूर्वावश्यकता धारण करीत नसल्याचे किंवा नेमणूकीसाठी आवश्यक असलेल्या अटींचा किंवा जाहिरातीमधील कोणत्याही अटीचा व शर्तीचा भंग होत असेल तर संबंधीत उमेदवारांची निवड कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

४) "उप विधी अधिकारी" या पदाच्या ऑनलाईन वैयक्तिक मुलाखत परीक्षा प्रक्रियेसाठी १:२ या प्रमाणात पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी घोषित करताना सर्व प्रकारची काळजी घेण्यात आलेली आहे. तथापि, अनावधनाने किंवा मुद्रण दोषामुळे झालेल्या चुका सुधारीत करण्याचा अधिकार महानिर्मिती कंपनीने राखून ठेवलेला आहे.

५) जाहिरात क्र.०३/२०२० च्या भरती प्रक्रियेचा अभिलेख निकाल घोषित केल्याच्या दिनांकापासून तीन (३) महिन्याच्या कालावधीसाठी जतन करण्यात येईल. त्यापुढील काळात कोणत्याही तक्रारीची दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी विशेष नोंद घ्यावी.

६) ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीकरीता उपस्थित राहणाऱ्या उमेदवारांनी वाम मार्गाचा अवलंब केल्याचे (जसे राजकीय दबाव, खोटी कागदपत्रे सादर करणे, धमकी देणे व इतर कोणतेही गैरकृत्य) निदर्शनास आल्यास, उमेदवाराची निवड ही भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर ताबडतोब रद्द करण्यात येईल.

७) अयशस्वी उमेदवारांनी कोणत्याही प्रकारचे पत्रव्यवहार महानिर्मिती कंपनीकडे करु नये. उमेदवारांच्या कोणत्याही पत्र व्यवहाराची महानिर्मिती कंपनीकडून दखल घेतली जाणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

..२/-

"उप विधी अधिकारी" या पदाच्या कागदपत्रे जमा करण्याच्या प्रक्रियेअंती पात्र / अपात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्याकरीता खालील टिकाणी क्लिक ↵ करावे.

| "उप विधी अधिकारी" या पदाची पात्र / अपात्र उमेदवारांची यादी ↵ |
|---|

"उप विधी अधिकारी" या पदाच्या १:२ या प्रमाणात ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी प्राप्त करुन घेण्याकरीता खालील टिकाणी क्लिक ↵ करावे.

| "उप विधी अधिकारी" या पदाच्या १:२ या प्रमाणात ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीकरीता पात्र ठरलेल्या उमेदवारांची यादी तसेच ऑनलाईन वैयक्तिक मुलाखतीकरीता उमेदवारांनी उपस्थित राहावयाच्या विद्युत केंद्राचे नाव, पत्ता व संबंधित अधिकाऱ्यांची माहिती. ↵ |
|---|

वैयक्तिक मुलाखतीची दिनांक व वेळ :- दि.१२/०७/२०२२, सकाळी ११.०० वाजता.

**Personal Interview Time & Date :- Dt.12/07/2022, 11.00 a.m.**

(भि.य.मंता)
कार्यकारी संचालक (मासं)